


::*:: पूर्वकथन ::*::

मराठीत आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचे दालन काही प्रमाणात समृध्द आहे असे विधान करता येते. भिन्नभिन्न व्यवसाय क्षेत्रांतील व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. यात राजकारणी, समाजकारणी, शिक्षक, डॉक्टर, पत्रकार, कलावंत इत्यादींची आत्मकथाने आहेत. अलीकडच्या काळात सामान्य स्तरातल्या स्त्री-पुरुषांनीही आपापले अनुभव आत्मकथनातून व्यक्त केलेले आढळतात. याचा परिणाम असा झाला की, आत्मवृत्तांचे दालन विविधतेने समृध्द होत गेले. कादंबरी पेक्षाही काही वाचक आत्मचरित्रांचे वाचन अधिक उत्सुकतेने करतात असे दिसते. अखेर आत्मचरित्र ही वाङ्मयकृती देखील कादंबरी सारखीच रंजक आणि उद्बोधक असू शकते. कादंबरी ही कल्पितावर आधारलेली तर आत्मकथन हे वास्तवाधिष्ठित असल्यामुळे आत्मचरित्राचे आवाहन कित्येक वाचकांना अधिक असते.

आत्मचरित्रांचे वाचन करताना श्री.म. माटे यांचे "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" हे आत्मवृत्त माझ्या वाचनात आले. एक हृदयस्पर्शी कथाकार म्हणून माट्यांचीप्रतिमा माझ्या मनात दृढ होती. या श्रेष्ठ कथाकाराच्या जीवनाचे दर्शन त्याच्याच शब्दांतून करून देणारे हे आत्मकथन मला विशेष आवडले. एम्.फिल्. साठी या ग्रंथाचा सर्वांगीण अभ्यास करावा असे मला वाटले. मराठीत आत्मचरित्रांची संख्या बरीच असली तरी प्रांजलपणाने, अभिनिवेश-रहित वृत्तीने लिहिली गेलेली आत्मचरित्रे थोडी आहेत. बहुधा आत्मकथनात लेखकाचा अहंकार आणि पूर्वग्रह नको तितके डोकावतात. स्वत:ची वकिली करण्यासाठीच ही कथने लिहिली जातात. पण श्री.म. माटे यांचे आत्मकथन मात्र या दोघांपासून अलिप्त असलेले आणि स्वत:बद्दल योग्य ते मूल्यांकन करणारे असे आहे. सत्याचा कोठे

यात अपलाप झाला असे उदाहरण आढळत नाही. किंबहुना प्रांजळ कथन, सत्याचे समुचित आणि संयमी दर्शन हेच या आत्मचरित्राचे प्रमुख वैशिष्टय मानावे लागेल. कार्लाइलने एका ठिकाणी म्हटले आहे -

" A well-written life is almost as rare as a well spent one".

"चांगल्या जीवनाप्रमाणेच चांगले चरित्र दुर्मिळ असते". मादयांचे जीवन, सत्ता, संपत्ती इत्यादी अंगांना चांगले किंवा समृध्दही नसेल पण परिस्थितीबरोबर दोन हात करीत राहिलेल्या एका सत्प्रवृत्त शिक्षकाचे, लेखकाचे आणि समाजसुधारकाचे ते चांगले जीवन आहे. या जीवनाचे "चित्रपट" या आत्मकथनात पडलेले प्रतिबिंब हे म्हणूनच चांगले आहे. अशा चरित्राचा अभ्यास करण्याची मला प्रेरणा मिळाली हे मी माझे भाग्य समजते.

श्री.म. माटे हे एक अनेकांगी व्यक्तिमत्व आहे. महाराष्ट्रातल्या निवडक श्रेष्ठ साहित्यकारांत त्यांची गणना होते. एक विचारवंत लेखक, एक ज्ञाननिष्ठ प्राध्यापक, अस्पृश्यतेचे निर्मूलन व्हावे असे मानणारा आणि त्यासाठी निष्ठेने आपल्याला शक्य ते प्रयत्न करणारा एक त्यागी समाजसेवक, एक थोर वक्ता, देशाच्या स्थितीबद्दल चर्चा-चिकित्सा करणारा एक राष्ट्रीय वृत्तीचा जागरूक देशभक्त आणि स्वत:चा प्रपंच काटकसरीने पण स्वाभिमानाने करणारा एक सद्गृहस्थ असे कितीतरी पैलू त्यांच्या व्यक्तित्वाचे सांगता येतील. मादयांच्या आत्मचरित्रातून हे पैलू व्यक्त झाले आहेत. त्यांचा वेध घेणे हा माझ्या आनंदाचा एक विषय आहे. मादयांचे आत्मकथन वाचकांना एक प्रकारचा प्रगल्भ आनंद देते.

एकूण सहा प्रकरणांतून या आत्मचरित्राचा मी माझा अभ्यास प्रस्तुत प्रबंधिकेतून मांडला आहे. खरे तर श्री.म. माटे हा एक व्यापक विषय आहे. एखादया प्रबंधिकेत मावण्याइतकी त्याची कक्षा लहान नाही याची मला जाणीव आहे. श्री.म. माटे यांच्या समग्र व्यक्तित्वाचा आणि संपूर्ण वाङ्मयाचा हा अभ्यास नव्हे. आत्मचरित्रातून प्रकट झालेले माटे यांच्या जीवनाचे, कर्तृत्वाचे जे विशेष आहेत त्यांचा मागोवा घेऊन मी त्या संदर्भात काही माझे निष्कर्ष काढले आहेत. श्री.म. माटे यांच्यासंबंधी कित्येक लेखकांनी लिहिलेले "स्फुट लेख" या अभ्यासासाठी मला मार्गदर्शन ठरले. त्या सर्व लेखकांची मी मन:पूर्वक ऋणी आहे. प्रबंधिकेचे लेखन करताना वेळोवेळी काही अभ्यासकांशी केलेल्या चर्चेचा व त्यांनी दिलेल्या माहितीचा मला उपयोग झाला. त्यांचा नामनिर्देश येथे करीत आहे. या शोधप्रबंधिकेचे मार्गदर्शक प्रा.डॉ. निर्मलकुमार फडकुले यांची मी अत्यंत ऋणी आहे. त्यांनी केवळ या शोधप्रबंधिकेचे मार्गदर्शनच केले नाही तर अभ्यासाची एक चिकित्सक दृष्टी व दिशा दिली. तसेच प्रा.डॉ. राजशेखर हिरेमठ, प्रा.डॉ.राजेंद्र बिडकर यांनी या अभ्यासास बहुमूल्य मदत केली. संगमेश्वर महाविद्यालयाचे ग्रंथपाल व विशेषत: सहाय्यक ग्रंथपाल के. सुचरिता यांनी आवश्यक ते अभ्यासोपयोगी ग्रंथ मला उपलब्ध करून दिले. दयानंद कॉलेजच्या प्राध्यापकांनीही मला संदर्भ ग्रंथ मिळवून दिले. याशिवाय हिराचंद नेमचंद वाचनालयातील ग्रंथपालानीही मदत केली. माझ्या आई-आप्पांनीही मला वेळोवेळी मार्गदर्शन केले त्यांचीही मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे श्री. संजय सोरेगांवकर यांनी थोड्या अवधीतच उत्कृष्ट टंकलेखन करून दिले त्याबद्दल त्यांचे व या कार्यात ज्यांनी मला लहान मोठी मदत केली त्या सर्वांची मी ऋणी आहे.

[ संजीवनी शंकरराव झळके ]